पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११२४/२०१३
दिनांक : २८ / ११ / २०१३

प्रति,

मा........................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा दिनांक **०६/१२/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत**.**

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/१२/२०१३** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.
मा.विधी समिती सभा
**कार्यपत्रिका क्रमांक १३**

दिनांक : **०६/१२/२०१३** वेळ : दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/१२/२०१३** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०१/११/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.११)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** श्री. सतिश कुलकर्णी, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/०७/२०१३ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** श्री. ज्ञानेश्वर ढेरे, सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २३/०९/२०१३ पासून पुढे१ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.४)** श्री.प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार मुख्यलेखापाल पदावरील नियुक्तीसंदर्भात मे.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन स्टॅम्प क्र. २३३१७/२०१२ पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन व पिं.चिं.मनपा या दाव्यामध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधीन राहून २३/०७/२०१३ पासून पुढे ०१ वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.५)** जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर खाली नमुद केलेप्रमाणे -

| अ.क्र. | नांव | पदोन्नतीचे पदनाम | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | डॉ.पाटणेकर राजीव विष्णूपंत | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |
| २ | डॉ.पोटे संजय लक्ष्मण | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला(इ.मा.व) |
| ३ | डॉ.जॉन सुनिल | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | खुला |

अधिका-यांना पे बँड र.रु. १५६०० - ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये जेष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता मिळण्यासाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.६)** श्री.खांडकेकर प्रशांत शरद, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.७)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ मधील प्रस्तावात नमुद प्रमाणे परिशिष्ट १ ते ६ मधील सेवा भरती करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती, अधिकारी व कर्मचारी यांच्या पदासाठीची शैक्षणिक अर्हता, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विभागीय परीक्षा नियम, पदोन्नतीसाठी एकत्रित संवर्ग, विविध पदांची पदोन्नती साखळी, अनुसरावयाचे महत्वाचे शासन निर्णयाची यादी यांस महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) (अ) व (ब) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.८)** महानगरपालिकेतील कामकाजासाठी काही नवीन विभाग सुरु करणे त्यासाठी आवश्यक असणा-या गट अ ते ड मधील काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ करणे, आवश्यक तेथे नवीन पदांची निर्मिती करणे आवश्यक असल्याने काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ सुचविली आहे. तर काही नवीन पदांची निर्मिती करुन त्यांची शैक्षणिक अर्हता, पदोन्नती सोपान, वेतनश्रेणी व पदसंख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. यामुळे महापालिका आस्थापना खर्चात वार्षिक ८९.८९ कोटीने वाढ होणार आहे. सन २०१२-१३ या वर्षाचा आस्थापना खर्चाची आऊटसोर्सिंगच्या खर्चासह टक्केवारी २३.६१ टक्के आहे. सन २०१३-१४ मधील महसुली उत्पन्न १९२६ कोटी असून आस्थापना खर्च ५०७.६२ कोटी इतका अपेक्षित आहे. आस्थापना खर्चाची टक्केवारी २७.०७ टक्के आहे. नवीन पदांची निर्मिती व पदसंखेत वाढ केल्याने ८९.८९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एकूण आस्थापना खर्च ५९७.५१ कोटी इतका होईल. हा आस्थापना खर्च सन २०१३-१४ च्या महसूली उत्पन्नाच्या ३१ टक्के इतका होईल. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब ' मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यकता नसणारी अथवा आऊटसोर्सिंगद्वारे कामकाज करुन घेता येऊ शकणारी काही

अनावश्यक पदे व्यपगत/निरस्त करणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब' नुसार सदर पदे निरस्त करण्यास तसेच प्रपत्र 'अ' नुसार आवश्यक पदांच्या संख्येत वाढ करण्यास व नवीन पदांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ (४) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.९)** पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (स्थापत्य) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच श्री.संजय कांबळे, उपअभियंता यांना आदेश क्र.आ.कक्ष/कावि/१०३/१३, दि.६ एप्रिल २०१३ अन्वये केलेली शास्ती विचारात घेऊन खालीलप्रमाणे नमुद उपअभियंता(स्थापत्य) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधीकरीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. कन्हेरे बिमलरॉय रामराव | डी.सी.ई. | खुला |
| २ | श्री. कांबळे संजय दिनकर | डी.सी.ई. | खुला (अनु.जाती) |

( दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.१०)** पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व उप अभियंता (विद्युत) पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इत्यादी सेवाविषयक तपशील पडताळून तसेच शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.२/१००५/१२,दि.२५/०२/२००५ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे नमुद उपअभियंता (विद्युत) पदावरील अधिका-यांना कार्यकारी अभियंता (विद्युत) पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: एक वर्ष कालावधी करीता पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. गलबले बाळासाहेब यशवंत | डी.सी.ई. | खुला |
| २ | श्री. घोडे प्रविण आण्णासाहेब | डी.सी.ई. | खुला (इ.मा.व.) |
| ३ | श्री. केदारी पांडूरंग साबा | डी.ई.ई. | अनु.जमाती |

( दिनांक ०६/१२/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.११)** मुंबई पुणे रस्त्यावरील दापोडी ते फुगेवाडी सी.एम.ई. रस्ता रुंदीकरणातील रस्ता सुधारणा करणेच्या कामांतर्गत विद्युत विषयक कामासाठी येणा-या र.रु.८६,१८,५००/- (अक्षरी र.रु.शहाऐंशी लाख अठरा हजार पाचशे फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ११२४ /२०१३
दिनांक : २८/११/२०१३

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.